सकाळ अॅग्रोवन
बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

डॉ. मनोज माळी

**लागवडीच्या पद्धतीनुसार हळद काढणीची पद्धत अवलंबावी. सरी वरंबा पद्धतीत टिकाव किंवा कुदळीच्या साह्याने हळदीची खांदणी करावी. तर गादीवाफा पद्धतीत ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्राचा वापर करावा.**



यंत्राद्वारे गादीवाफ्यावरील हळदीची काढणी.



ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्र.

# सुधारित पद्धतीने हळद काढणी

हळद हे प्रमुख नगदी मसाला पीक असून हळदीचा उपयोग दैनंदिन आहारात, औषधांमध्ये, सौंदर्य प्रसाधनामध्ये, जैविक कीटकनाशकांमध्ये वापर केला जातो. हळद लागवडीमध्ये हळदीची काढणी ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. साधारणपणे जातीपरत्वे हळद काढणीस ७ ते ९ महिन्यांचा कालावधी लागतो. यामध्ये प्रामुख्याने हळव्या जातींना तयार होण्यास लागवडीपासून ६ ते ७ महिने लागतात. (उदा. आंबे हळद, आयआयएस आर-प्रगती) तर निम गरव्या जाती या ७ ते ८ महिन्यांत काढणीस येतात. (उदा. फुले स्वरूपा, केदारम, अलेप्पी) गरव्या जाती ८ ते ९ महिन्यांमध्ये काढणीस तयार होतात (उदा. सेलम, कृष्णा, राजेंद्र सोनिया). त्यामुळे जातीपरत्वे कालावधी पूर्ण झाल्याशिवाय पाला कापू नये.

## काढणी नियोजन

- जमिनीच्या पोताप्रमाणे माळरानावरील हलक्या जमिनीमध्ये हळद पिकाचा परिपक्वता कालावधी पूर्ण होतेवेळी ८० ते ९० टक्के पाने वाळलेली असतात. मध्यम व भारी जमिनीमध्ये ६० ते ७० टक्के पाने वाळलेली असतात. हे हळद पीक काढण्यासाठी परिपक्वतेचे मुख्य लक्षण मानले जाते.
- हळदीच्या काढणी अगोदर साधारण १५ ते ३० दिवस आधी पाणी देणे बंद करावे. पाणी एकदम बंद करू नये. पाणी देणे थोडे थोडे करून कमी नंतर पूर्ण बंद करावे. त्यामुळे पानातील अन्नरस कंदामध्ये लवकर उतरण्यास मदत होते. हळकुंडाला वजन, गोलाई आणि चकाकी येते. पिकास पाणी शेवटपर्यंत चालू ठेवले तर हळकुंडांना नवीन फुटवे फुटू लागतात. त्यामुळे उत्पादनात घट होते.
- हळदीचा पाला वाळल्यानंतर १ इंच जमिनीच्यावर खोड ठेवून धारदार विळ्याच्या साह्याने हळदीचा पाला कापावा. पाला बांधावर गोळा करावा, शेत ४ ते ५ दिवस चांगले तापू द्यावे. त्यामुळे हळदीच्या कंदामध्ये असलेल्या पाण्याच्या अंशामुळे जमीन साधारणपणे भेगाळली जाते. त्यामुळे हळदीची काढणी करणे सुलभ होते.
- हळद लागवडीच्या पद्धतीनुसार हळद काढणीची पद्धत अवलंबावी. सरी वरंबा पद्धतीत टिकाव अथवा कुदळीच्या साह्याने हळदीची खांदणी करावी तर गादीवाफा पद्धतीत ट्रॅक्टरचलित हळद काढणी यंत्राचा वापर करावा.
- हळदीची काढणी करतेवेळी जमीन पूर्णपणे वाळली असल्यास हलके पाणी द्यावे. त्यामुळे हळद काढणी करणे सोपे होते.
- खांदणी करून काढलेले कंद २ ते ३ दिवस सूर्यप्रकाशात चांगले तापू द्यावेत. त्यामुळे कंदास चिकटलेली माती पूर्णपणे निघण्यास मदत होते.
- काढणीनंतर २ ते ३ दिवसांनी हळदीच्या कंदाची मोडणी करावी. हळदीच्या कंदाचा गड्डा आपटल्यास हळकुंडे व गड्डे एकमेकांपासून वेगळे होतात. त्यानंतर जेठे गड्डे बगल गड्डे, हळकुंडे, सोरागड्डे, कुजकी सडलेली हळकुंडे अशा कच्च्या मालाची प्रतवारी करून वेगवेगळ्या ठिकाणी साठवणूक करावी.
- हळदीची काढणी केल्यानंतर साधारणतः १५ दिवसांच्या आत त्यावर प्रक्रिया करावी, म्हणजे हळदीची प्रत व दर्जा चांगला राहतो.
- जातीपरत्वे साधारणपणे एकरी १५० ते २०० क्विंटल ओल्या हळदीचे उत्पादन मिळते तर प्रक्रिया करून ३० ते ४० क्विंटल उत्पादन मिळते.

## पारंपरिक पद्धतीने हळद काढणी

- या पद्धतीत पूर्णपणे कंद जमिनीतून निघत नाहीत. साधारणपणे १० ते १५ टक्के कंद जमिनीत राहतात.
- सरी वरंबा अथवा गादीवाफा पद्धतीने लागवड केलेल्या ठिकाणी या पद्धतीद्वारे हळदीची काढणी करता येते.
- या पद्धतीने काढणीसाठी एकरी १८ ते २० मजूर लागतात.
- खांदणी करताना कंदास इजा होण्याची शक्यता असते.



पारंपरिक पद्धतीने हळदीची काढणी.

## काढणीनंतर प्रतवारी

### अ) जेठा गड्डे

मुख्य रोपाच्या खाली वाढणाऱ्या कंदास जेठा गड्डे (मातृकंद) म्हणतात. हे गड्डे प्रामुख्याने पुढील वर्षी लागवडीसाठी वापरले जातात. त्यामुळे काढणीनंतर हे गड्डे ताबडतोब सावलीमध्ये ठेवावेत.

### ब) सोरा गड्डा

लागवडीसाठी वापरलेले कंद ५० ते ६० टक्के कुजून जातात, राहिलेले ४० ते ५० टक्के कंदांना सोरा गड्डे म्हणतात. हे काळपट रंगाचे मुळ्या विरहित असतात. त्यांना हळकुंडापेक्षा दुप्पट भाव मिळतो.

### क) बगल गड्डे

जेठा गड्ड्याला आलेल्या फुटव्यांच्या खाली बगल गड्डे तयार होतात, त्यास 'अंगठा गड्डे' असेही म्हणतात. ४० ग्रॅम पेक्षा जास्त वजन असणाऱ्या गड्ड्यांचा वापर बेणे म्हणून केला जातो.

### ड) हळकुंडे

बगल गड्ड्यांना आलेल्या कंदास 'हळकुंडे' असे म्हणतात. प्रामुख्याने प्रक्रिया करून बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी याचा वापर करतात. यातील काही हळकुंडांना उपहळकुंडे येतात, त्यास 'लेकुरवाळे हळकुंडे' असे म्हणतात. यांचा वापर धार्मिक कार्यात मोठ्या प्रमाणावर केला जातो.

## यंत्राद्वारे काढणी

- केवळ गादीवाफा पद्धतीने लागवड केलेल्या हळदीची काढणी यंत्राद्वारे करता येते.
- हळद काढणी यंत्र जमिनीतील कंदाला खालून वर उचलत असल्याने केवळ १ ते २ टक्के कंदच जमिनीमध्ये राहतात.
- कंद जमिनीतून अलगद उचलत असल्याने कंदास कोणत्याही प्रकारची इजा होत नाही.
- काढणी जलद होते. मजुरी खर्चात बचत होते.

- डॉ. मनोज माळी
९४०३७ ७३६१४
(लेखक महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हळद संशोधन योजना, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे प्रभारी अधिकारी आहेत.)